**दिनांक: २५/६/२३**

**विषय: संस्थेच्या पुनरनिर्माणा साठी एका विकसकाची निवड.**

आज पत्रकार नगर संस्थेच्या पुनरनिर्माण प्रकल्पा अंतर्गत शॉर्ट लिस्ट केलेल्या तीन विकसकांपेकी एका ची निवड करण्यासाठी मुनोत सभागृहात प्रथम तिन्ही निवडलेल्या विकसकांचे सादरीकरण आणि त्या नंतर विशेष सर्व साधारण सभेत गुप्त मतदानानंतर एका विकसकाची निवड करण्यात आली.

बिल्डर्स च्या सादरीकरणाला संस्थे चे सभासद आणि कुटुंबीय मिळून १३७ जणं उपस्थित होती तर नंतर झालेल्या सर्व साधारण सभे ला ८३ सभासद् उपस्थित होते.

सर्व प्रथम संस्थे चे अध्यक्ष श्री विजय सावंत यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्या नंतर श्री नेवाळकर यांनी आजच्या सादरीकरणा संबंधी माहिती सभे ला दिली. त्यांनी सांगितले की आज चे सादरीकरण तिन्ही बिल्डर्स चे पत्रकार नगर च्या पुनरनिर्माण संबंधी parseption काय आहे त्यावर आधारित असेल. तिन्ही बिल्डर्स ने त्यांच्या फायनल कमर्शिअल ऑफर्स १६/६/२३ च्या कट ऑफ तारखे पर्यंत पहिलेच दिल्या आहेत तेंव्हा त्यात आता कुठले ही बदल स्वीकारले जाणार नाहीत. त्या ऑफर्स सर्व सभासदांना बघण्यासाठी १८ ते २४ जून पर्यंत संस्थेच्या समाजमंदिरात ठेवण्यात आल्या होत्या तेंव्हा आज च्या सादरीकरणा नंतर सरळ एक विकसक मतदानाद्वारे निवडण्याची प्रक्रिया पार पाडली जाईल. ही प्रक्रिया ह्या साठी अधिकृत सहकारी उप प्रबंधक यांच्या देखी रेखी खाली होईल.

ह्या नंतर तिन्ही बिल्डर्स ने एक एक करून त्यांचे सादरीकरण एल सी डी प्रोजेक्टर वर प्रस्तुत केले तसेच सभासदांच्या प्रश्नांना उत्तरं ही दिली. ह्यात सर्व प्रथम मेजिस्टिक लेंड मार्क, शुभम न्याती आणि शेवटी कोहिनूर बिल्डर्स ने त्यांचे सादरीकरण केले.

ह्या तिन्ही सादरी करण्याचे चे संचालन आपले सल्लागार श्री हर्षल कवडिकर आणि एड. किरण काबरा यांनी केले.

सादरीकरणा नंतर सभासदांच्या कुटुंबियांना रजा देण्यात आली आणि पुढल्या मतदानास फक्त संस्थे चे सभासद / सहयोगी सभासदच उपस्थित राहिले.

सल्लागार अड. काबरा यांनी मतदाना ची प्रक्रिया कशी असेल हे सर्वांना समझाउन सांगितले. सहकार उपनिबंधक श्रीमती पाटील यांच्या देखरेखी खाली एक एक करून प्रत्येक सभासदाने एका विकसकाच्या निवडी साठी मतदान केले. सर्व ८३ सभासदांचा मतदाना नंतर त्याची मोजणी करण्यात आली आणि त्या नंतर सहकार उप निबंधक श्रीमती पाटील यांनी प्रत्येक विकसकाला मिळालेल्या मतांची आणि विजेता विकसक म्हणून **शुभम न्याती** यांची घोषणा केली. त्यांना ८३ पेकी ७५ तर मेजिस्टीक लेंडमार्क आणि कोहिनूर यांना प्रत्येकी ४ मतं पडली.

ह्याच विशेष सर्व साधारण सभेत निवडलेल्या विकसका बरोबर करावयाच्या मुख्य अटी व शर्ती साठी सभासदांची मान्यता घेण्यात आली. हा ठराव सर्व संमती ने मंजूर करण्यात आला.

दुसऱ्या ठरावा द्वारे निवडलेल्या विकसका ला, सभासदांनी स्वीकृत केलेल्या अटी व शर्ती च्या अधिन राहून, इरादा पत्र (Letter of Intent) वर सही करण्याचे अधिकार संस्थे चे अध्यक्ष आणि सचिव यांना देण्यात आले.

सर्वात शेवटी संस्थे चे सचिव श्री विनायक पटवर्धन यांनी सर्वांचे आभार मानून आज चा कार्यक्रम संपल्याची घोषणा केली.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती साठी**